महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-




रविवार ❖२७ जुलै २०२५ ❖वर्ष - सातवे ❖अंक ०३६ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# राज्यात प्राध्यापकांची मोठी भरती

## – उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात सध्या सरकारकडे पैसेच नसल्याची चर्चा केली जात असली, तरी आवश्यक कामासाठी सरकार पैसे कमी पडू देणार नाही, असे सांगत राज्यात प्राध्यापकांच्या ५ हजार ५०० प्राध्यापक, २ हजार ९०० कर्मचारी भरतीला मंजुरी देण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ, उच्च शिक्षण संवर्ग महाराष्ट्र प्रदेश आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी यांच्यातर्फे मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित विकसित महाराष्ट्र २०४७ जाणीव जागृती कार्यशाळेत पाटील बोलत होते. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. प्रदीप खेडकर या वेळी आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, रोज भेडसावणारे अनेक प्रश्न सोडवले जातील. त्याबरोबरच विकसित महाराष्ट्र २०४७ हे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत कुठेही कमी पडता कामा नये. त्यात येणारी मनुष्यबळाची समस्या दूर केली जाणार आहे. त्याचा पहिला टप्पा म्हणजे २०२९ हे वर्ष असेल. तोपर्यंत राज्यातील सर्व विद्यापीठांनी आपला दर्जा सुधारणे आवश्यक आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जागतिक क्रमवारीत स्थान उंचावले आहे.

> रोज भेडसावणारे अनेक प्रश्न सोडवले जातील. त्याबरोबरच विकसित महाराष्ट्र २०४७ हे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत कुठेही कमी पडता कामा नये.
>
> – उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील



येत्या पाच वर्षांत जगातील आघाडीच्या ५०० विद्यापीठांच्या यादीत स्थान मिळवण्याची अपेक्षा कुलगुरूंसह सर्व प्रमुखांकडे व्यक्त केली आहे. ही अपेक्षा राज्यभरातील विद्यापीठांकडे आहे.

### प्रत्येक जिल्ह्यात विद्यापीठ हवे

राज्यात विद्यापीठांची संख्या तुलनेने फारच कमी आहे. त्यामुळे विद्यापीठांवरील भार वाढला आहे. १५० महाविद्यालये संलग्नित असणे अपेक्षित असताना ८०० महाविद्यालये संलग्न असल्यास दर्जा सुधारणार कसा असा प्रश्न उपस्थित करत डॉ. एकबोटे यांनी प्रत्येक जिल्ह्यासाठी एक विद्यापीठ आणि संशोधन केंद्र सुरू करणे गरजेचे असल्याकडे लक्ष वेधले. दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने प्रशिक्षित शिक्षक पुरविणे, पायाभूत सुविधा वाढवणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षणावरील खर्चात वाढ केली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

# ठाण्यात ‘अर्पण’ची गुरू-शिष्य परंपरेची तेरावी मैफल

**एकाचवेळी एकाच मंचावर १७५ बासरीवादक छेडणार स्वर पद्मविभूषण पं.हरिप्रसाद चौरसिया यांची पं.विवेक सोनार यांच्याकडून पाद्यपूजा**


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: विवेक सोनार यांच्या गुरुकुल प्रतिष्ठानतर्फे ठाण्यात युनियन बँक आणि अस्मि इंटेरियरच्या मदतीने भारतीय संगीत परंपरेला समर्पित अनोखी मैफल रविवार २७ जुलै रोजी डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात सकाळी १० वाजता सादर होणार आहे. त्या निमित्ताने ठाण्यात प्रथमच १७५ बासरी वादक एकाच मंचावर गुरु हरिप्रसाद चौरसिया यांचे समोर बासरी वादन करणार आहेत.

भारतीय शास्त्रीय संगीताचा वारसा जपणारी आणि नवोदित कलाकारांना मंच देणारी गुरुकुल प्रतिष्ठान ही संस्था यंदा ‘अर्पण’ची तेरावी मैफल घेऊन आपल्या वार्षिक संगीत महोत्सवासाठी सज्ज झाली आहे.

हा कार्यक्रम केवळ संगीताचा आनंद देणारा नसून, तो गुरु-शिष्य परंपरेचं दर्शन घडवणारा, संस्कारांची जोपासना करणारा आणि परंपरा व नावीन्याचा सुरेख संगम साधणारा आहे. पं. विवेक सोनार यांनी आपल्या सांगीतिक वाटचालीत अनेक टप्पे पार करत गुरू पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या पावलावर पाऊल ठेवत ‘गुरूकुल’ संकल्पनेला मूर्त स्वरूप दिले आहे.

गुरुकुल प्रतिष्ठानच्या १७५ बासरीवादक शिष्यांची सामूहिक प्रस्तुती रागदारी आणि जुन्या-नव्या गाण्यांचा समन्वय, पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचा पाद्यपूजन सोहळा आणि पं. विवेक सोनार यांचं बासरी वादन असा कार्यक्रम होणार आहे. संस्थेचे अनेक विद्यार्थी देशभर ही परंपरा पुढे नेत असून, कार्यक्रमात पं. विवेक सोनार यांच्या शिष्यांचे शिष्यदेखील सादरीकरण करणार आहेत.



कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून रसिकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन गुरुकुल प्रतिष्ठान च्या कविता सोनार यांनी केले आहे. पं. विवेक सोनार हे पद्मविभूषण असून हरिप्रसाद चौरसिया यांच्या ज्येष्ठ शिष्यांपैकी एक असून, भारतीय बासरीवादनाच्या परंपरेत त्यांचं वेगळं स्थान आहे. त्यांनी देश-विदेशात अनेक प्रतिष्ठित मैफलींमध्ये बासरी वादन सादर केले आहे. तंत्र, भावना आणि साधना या त्रिसूत्रीच्या आधारे त्यांनी स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली आहे. गुरूंचा वारसा पुढे नेत त्यांनी गुरुकुल शैलीत शिक्षण दिलं पाहिजेया उद्देशाने ‘गुरुकुल प्रतिष्ठान’ची स्थापना केली. बासरीला समर्पित असा ‘बासरी उत्सव’, आणि ‘फ्ल्यूट सिम्फनी’ या अनोख्या संकल्पना मूर्त स्वरूपात आणणारे ते तरुण बासरीवादक आहेत.

# वस्त्रोद्योग क्षेत्रात सौर ऊर्जा वापरासाठी समिती स्थापन करा

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सामाजिक न्याय, आदिवासी विकास आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या नवीन सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत एकसमान निकष ठरवावे. या विभागांतर्गत असणाऱ्या सूतगिरण्यांसाठी त्या त्या विभागाने अतिरिक्त तरतूद करून द्यावी. तसेच वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरामध्ये येत असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी वस्त्रोद्योग आणि ऊर्जा विभागाची समिती स्थापन करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वस्त्रोद्योग विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, विधान परिषदेचे आमदार अमरीश पटेल, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने, रेशीम संचालनालयाचे संचालक विनय मुन, उपसचिव श्री.पवार, उपसचिव श्रीमती कोचरेकर आदी उपस्थित होते.



> **राज्यामधील राष्ट्रीय वस्त्र महामंडळाच्या अंतर्गत बंद असलेल्या मिल पुन्हा सुरू करण्याबाबत अहवाल तयार करावा**
>
> – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सहकारी सूतगिरण्यांना प्रति चाती रुपये पाच हजार प्रमाणे द्यावयाच्या कर्जावरील व्याज अनुदान योजनेस मुदतवाढ देताना यामध्ये आधुनिकीकरण आणि श्रेणीकरण करण्यात यावी. राज्यामधील राष्ट्रीय वस्त्र महामंडळाच्या अंतर्गत बंद असलेल्या मिल पुन्हा सुरू करण्याबाबत अहवाल तयार करावा. त्या आधारे बंद मिल पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात. याचबरोबर सहकारी सूतगिरण्या व सहकारी यंत्रमाग संस्थाकडील शासकीय देणी वसुलीबाबत धोरण तयार करण्यात यावे. याचबरोबर राज्यातील सर्व यंत्रमागाच्या नोंदी करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. पुणे येथील रेशीम संचालनालयाच्या वापरात असलेली इमारत दुरुस्ती व इतर सोयी सुविधा निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही तत्काळ पूर्ण करावी, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

नवीन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ निर्माण करणे, वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलीनीकरण करून वस्त्रोद्योग व रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करणे, सहकारी सूतगिरण्यांकडील अतिरिक्त जमीन विक्रीस परवानगी देण्याबाबतची योजना, सूतगिरण्यांना पुनर्वसन कर्ज देण्यासाठी नवीन योजना तसेच सूतगिरण्या भाडेपट्टीवर देण्यासाठी योजना तयार करणे, सहकारी सूतगिरणी यांची प्रकल्प अहवाल किंमत रुपये ८०.९० कोटी वरून रुपये ११८ कोटी इतकी सुधारित करण्याबाबतची कार्यवाही करणे, सातारा जिल्ह्यातील वाई येथील रेड क्रॉस सोसायटी यांच्याकडील लिजवरील जागा जिल्हा रेशीम कार्यालयाकरिता कायमस्वरूपी घेणे आदी महत्त्वपूर्ण विषयांचा आढावा यावेळी घेण्यात आला.




# खोपोली-खालापूरमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खोपोली : खोपोली-खालापूर परिसरात मागील तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने शुक्रवारी अधिकच जोर धरला. गुरुवारी संध्याकाळपासून सुरू झालेल्या सततच्या कोसळधार पावसामुळे संपूर्ण परिसर झोडपून काढला असून, सामान्य जनजीवन विस्कळित झाले आहे.



शेतीचे मोठे नुकसान झाले असून, भातलागवडीची कामे ठप्प झाली आहेत. शेतात पाणी गेल्याने शेतकरी चिंतेत आहेत. पाताळगंगा नदी दुथडी भरून वाहत असून, तिने धोक्याची पातळी ओलांडली आहे. नदीकाठी जाण्यास प्रतिबंध घालण्यात आला असून, तहसीलदार कार्यालयाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शुक्रवारी संध्याकाळी खंडाळा घाटातील अमृतांजन पुलाजवळ डोंगराचा काही भाग आणि माती रस्त्यावर आल्यामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. प्रशासनाने युद्धपातळीवर मलबा हटवून वाहतूक सुरळीत केली. खोपोली शहरातील अनेक सखल भागांत पाणी शिरले आहे. डीसी नगर, हनुमान मंदिर परिसर, खालची खोपोली, शिळफाटा या भागांमध्ये पाणी तुंबल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. पनवेल-खोपोली, खोपोली-पेण, खोपोली-पाली मार्गावरही ठिकठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक विस्कळित झाली आहे. दरडग्रस्त भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आपत्कालीन यंत्रणा, नगरपालिका, अग्निशमन दल आणि हेल्प फाउंडेशनचे स्वयंसेवक सतर्क असून, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने मदतीसाठी सज्ज आहेत. दरम्यान, पावसाच्या तीव्रतेचा अंदाज घेत जिल्हा प्रशासनाने शुक्रवारी व शनिवारी दोन दिवस शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. सुदैवाने लोकल सेवा सुरळीत सुरू राहिल्याने नोकरदार वर्गाला दिलासा मिळाला आहे.






# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : विकासाच्या दूरदृष्टीसह सुशासनाचा आदर्श घालून देणारे व्यक्तीमत्व

भारताचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या राष्ट्रनिर्माणाच्या ऐतिहासिक प्रक्रियेत महाराष्ट्राचे अमूल्य योगदान असेल यात मला कोणतीही शंका नाही. लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात महाराष्ट्राचे नेतृत्व असल्यानेच हे शक्य होणार आहे. फडणवीस यांच्या सर्वसमावेशक भूमिकेमुळेच राज्याचे ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे स्वप्न मूर्त स्वरूपात जनतेला पाहायला मिळणार आहे. त्यांच्या मंत्री मंडळात मंत्री म्हणून काम करण्याचा अनुभव म्हणजे विकासाची दूरदृष्टी आणि समाजकारणाचा ठेवा आहे असे मी मानतो. देवेंद्रजी कसलेले राजकारणी तर आहेतच त्याचबरोबर तितक्याच आत्मीयतेने जनतेच्या सेवेसाठी प्रशासनावर जबरदस्त पकड असणारे, सुशासनाचा आदर्श घालून देणारे, जनतेला लोकाभिमुख सेवा देणारे मुख्यमंत्री आहेत. कणखर बाण्याच्या या दृढनिश्चयी व्यक्तिमत्वाचा २२ जुलै रोजी जन्मदिन असून त्यांना माझ्या मनःपूर्वक लाख लाख शुभेच्छा!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एक व्हिजनरी नेतृत्व आहे. राज्यकारभारात अत्यत जटील प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचा हातखंडा आहे. सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यकाळात विविध विभागाच्या कामगिरीचा आढावा त्यांनी घेतला. यात प्रशासकीय मूल्यमापन करण्याचा धाडसी निर्णयही त्यांनी घेतला. विभागांना जाहीररीत्या मूल्यांकन त्यांनी दिले. या निमित्ताने सरकारच्या कारभाराची जनतेत चर्चा होईल, याची जराही भीती फडणवीस यांनी बाळगली नाही. केवळ सकारात्मक परिणाम साधण्यासाठी तसेच तत्परतेने प्रशासकीय काम करण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेत त्यांनी हा नवा पायंडा त्यांनी घालून दिला. जनतेच्या हितासाठी धाडसी निर्णय घेणे हा फडणवीस यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलू यातून स्पष्ट होतो.

माझ्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता या विभागावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. केवळ शहरी भागातच नाही. तर ग्रामीण तरुणांनाही स्टार्ट अप्सच्या माध्यमाने उज्जवल भविष्य देण्याचा त्यांचा मानस आहे. महाराष्ट्रभरातील स्टार्ट अप सुरु करू इच्छिणाऱ्या होतकरू तरुणांसाठी एकात्मिक सुविधा केंद्र सुरु केले जाणार आहे.देशात सर्वाधिक २८ हजार स्टार्टअप्स महाराष्ट्रात आहेत यामध्ये महिला स्टार्टअप्सची संख्याही देशात अग्रेसर आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप्सला चालना देण्यासाठी ५२ महिलांना २ कोटी ३४ लाख रूपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे आणि त्यामध्ये वारंवार वाढच होत आहे. मुंबईतील चांदिवली अल्पसंख्यांक शासकीय औद्योगिक शिक्षण प्रशिक्षण संस्था येथे नियोजित इमारतीचा आराखडा तयार करण्यात येत आहे. ही नियोजित वस्तू भारतातील एकमेव आणि अद्वितीय केंद्र म्हणून नावारूपाला येऊन महाराष्ट्रात स्टार्ट अप संस्कृती रुजवण्यास मदत होणार आहे. राज्यात २० आय.टी.आय मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. देशातील पहिली इनोव्हेटिव्ह सिटी महाराष्ट्रात उभारण्याचा निर्णय घेतला आहे. गिफ्ट सिटी च्या धरतीवर नवी मुंबई येथे ५०० कोटी खर्च करून २५० एकर मध्ये अत्याधुनिक हाय टेक सुविधायुक्त सिटी निर्माण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी नाविन्यता विभाग युद्धपातळीवर कार्यरत असून मुख्यमंत्री फडणवीस यांचे मोलाचे सहकार्य यात लाभत आहे. सिंगापूर येथील आयटीई एज्युकेशन सर्व्हिसेस ( ITEES ) या संस्थेच्या सहकार्याने महाराष्ट्रात जागतिक कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याची योजना कौशल्य विभागाने आखली आहे. जागतिक दर्जाचा कौशल्य विकास साधत महाराष्ट्रातील तरुणांना जागतिक रोजगाराच्या संधी या योजनेमुळे उपलब्ध होणार आहेत. यातही मुख्यमंत्री फडणवीस यांचे सहकार्य लाभत असून लवकरच अत्याधुनिक ट्रेड्स सह हे जागतिक कौशल्य विकास केंद्र उभे राहील,याची मी निसंकोचपणे ग्वाही देतो.

कौशल्य विकास विभागाकडून महत्वकांक्षी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवण्यात येत असून सुरूअसलेल्या या योजनेत सद्य स्थितीत १ लाख ५० हजार विद्यार्थी कार्य प्रशिक्षण घेत आहेत. नुकताच कार्य प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांवरून ११ महिन्यांचा करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील १८ ते ३५ वयोगटातील युवकांना विविध महामंडळे, उद्योग आणि आस्थापनांमध्ये प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा सहा हजार, आयटीआय किंवा पदविका प्राप्त विद्यार्थ्यांना आठ हजार तर पदवी / पदव्युत्तर प्राप्त प्रशिक्षणार्थींना १० हजार रुपये विद्यावेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जात आहे. कौशल्य विभागाच्या या महत्त्वपूर्ण योजनेत मुख्यमंत्र्यांचे अमूल्य योगदान आहे. आतापर्यंत या योजनेवर ४८१ कोटी इतके रूपये खर्च झाले आहेत.



केवळ एका विभागापुरतेच नाही तर राज्यातल्या प्रत्येक विभागातल्या विविध योजनांमध्ये मुख्यमंत्री फडणवीस स्वतः लक्ष घालून योजना सुसूत्रपणे जनतेपर्यंत कशी पोहोचेल याची काळजी ते घेतात. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयातंर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांतर्गत माहे डिसेंबर, 2024 ते मे, 2025 या कालावधीमध्ये विविध योजनांद्वारे एकूण 1,34,303 उमेदवारांना रोजगार प्राप्त झालेला आहे. कौशल्य विभागाच्या अंतर्गत राज्यात 203 रोजगार मेळावे संपन्न झालेले असून यामध्ये 2492 उदयोजकाद्वारे 1,20,572 रिक्तपदे अधिसूचित करण्यात आली. सदर रोजगार मेळाव्यात 63,441 उमेदवार सहभागी झाले. त्यापैकी 23,854 उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या विभागाचे काम सुसूत्रपणे अविरत सुरु आहे. पंखांना बळ देण्याची त्यांची भूमिका राज्याला प्रगतीच्या नव्या शिखरावर घेऊन जाईल यात मला तसूभरही शंका नाही. मुख्यमंत्री फडणवीस केंद्रीय पातळीवरही विविध योजनांचा पाठपुरावा करून कौशल्य विभागाला अधिक सक्षम करत आहेत. यापैकीच एक योजना आहे 'मॉडेल करिअर सेंटर' ग्रामीण तसेच निमशहरी भागातील रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी, पारदर्शीरित्या व प्रभावी पध्दतीने तंत्रज्ञानाच्या सहायाने समुपदेशन आणि प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत मॉडेल करिअर सेंटर ही योजना सुरु करण्यांत आलेली आहे. केंद्र शासनाच्या रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय तसेच श्रम व रोजगार मंत्रालयामार्फत "राष्ट्रीय करीयर सेवा" (National Career Service) ही योजना मंजुर करण्यात आलेली आहे. डिसेंबर २०२४ ते जून २०२५ या कालावधीत 1,26,482 उमेदवारांची नोंदणी झाली असून 62,862 उमेदवारांचे समुपदेशन करण्यात आले. प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रही कौशल्य विकासाच्या माध्यमाने या संकल्पात आपले योगदान देत आहे.

विविध रोजगार मेळावे,मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना,प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना,दिनदयाळ अंत्योदय योजना,आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र तसेच आयटीआय,रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ,राज्य नाविन्यता सोसायटी,कौशल्य विकास आयुक्तालय यांच्यामार्फत यासह विविध रोजगाराच्या योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कालावधीत सुरू करण्यात आल्या. या योजनांमुळे युवकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून हा फार मोठा सामाजिक बदल दिसून येत आहे. युवकांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण मिळाल्यामुळे भविष्यात समाजासाठी आणि देशासाठी काहीतरी वेगळं करून दाखवण्याची उर्मी तरुणांमध्ये जागृत होत आहे. जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण तरुणांना देशातच नाही तर विदेशातही रोजगाराच्या संधी मिळवून देत असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यकारभार करण्यात जसे पारंगत आहेत. तसेच त्यांची पक्षावरही निष्ठा आहे. पक्षाची ध्येय धोरणं राबवण्यात ते मागे राहत नाहीत. मोठ्या पदावर असूनही आपल्यातला कार्यकर्ता त्यांनी जिवंत ठेवलाय. अनेकदा राजकीय स्थित्यंतरे हा राजकारणाचा अविभाज्य भाग असतो. अशाच एका स्थित्यंतरतुन ३० जून २०२२ मध्ये शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून आणि देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री पदाचा सलग पाच वर्षाचा दीर्घ अनुभव, सर्वाधिक आमदारांचे पाठबळ आणि सक्षम नेतृत्वगुण अंगी असतानाही त्यांनी पक्षाचा आदेश पाळत, उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन पक्षाच्या अनुशासनाची प्रचिती साऱ्या जगाला करून दिली. व्यक्ती मोठी नाही तर पक्ष मोठा हा संस्कार त्यांनी आपल्या कृतीतून कार्यकर्त्यांवर केला,असे अनुशासित मुख्यमंत्री सर्वसमावेशक नेतृत्व महाराष्ट्राला लाभले आहे. महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेणाऱ्या या कर्तृत्वान, दूरदृष्टीच्या नेत्याला आरोग्यदायी उदंड आयुष्य लाभो, ही त्यांच्या जन्मदिनी सदिच्छा व्यक्त करतो.

## गीतासार



**अध्याय १७**

**श्रद्धात्रयविभागयोगः**

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् । असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ १७-२८ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), श्रद्धेशिवाय केलेले हवन, दिलेले दान, केलेले तप आणि जे काही केलेले शुभ कार्य असेल, ते सर्व असत् म्हटले जाते. त्यामुळे ते ना इहलोकात फलदायी होत ना परलोकात. ॥ १७-२८ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः ॥१७॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील श्रद्धात्रयविभागयोगः नावाचा हा सतरावा अध्याय समाप्त झाला. ॥ १७ ॥

## आरोग्य

### सकाळी रिकाम्या पोटी या ७ गोष्टी खाऊ नका

1 संत्री आणि गोड लिंबू यासारखी लिंबूवर्गीय फळे

संत्री, गोड लिंबू आणि लिंबू यासारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये सायट्रिक आम्लचे प्रमाण खूप जास्त असते. सकाळी रिकाम्या पोटी हे पदार्थ खाल्ल्याने पोटाच्या आतील आवरणावर थेट परिणाम होतो, ज्यामुळे आम्लपित्त, छातीत जळजळ आणि गॅसची समस्या उद्भवू शकते. ज्यांना आधीच आम्लपित्त, GERD किंवा पोटाच्या समस्या आहेत त्यांच्यासाठी हे विशेषतः हानिकारक आहे. पोटात आधीच काही अन्न असताना दिवसाच्या मध्यभागी लिंबूवर्गीय फळे खाणे चांगले.

2 कच्च्या भाज्या किंवा सॅलड

आरोग्याच्या जाणीवेमुळे बरेच लोक सकाळी लवकर सॅलड खाण्यास सुरुवात करतात, परंतु ही सवय उलटी होऊ शकते. काकडी, टोमॅटो किंवा गाजर यासारख्या कच्च्या भाज्यांमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते जे रिकाम्या पोटी खाल्ल्याने पचनसंस्थेवर दबाव येतो आणि त्यामुळे गॅस किंवा पोटफुगी होऊ शकते. सकाळी शरीराला मऊ आणि उबदार पदार्थांची आवश्यकता असते, जेणेकरून पचन प्रक्रिया हळूहळू सक्रिय होऊ शकेल.

3. कॉफी किंवा ब्लॅक कॉफी

कॉफीमध्ये जास्त प्रमाणात कॅफिन असते ज्यामुळे पोटात आम्लपित्त निर्माण होते. रिकाम्या पोटी सेवन केल्यास आम्लपित्त, छातीत जळजळ आणि पोटदुखी देखील होऊ शकते. हे जास्त काळ केल्याने अल्सरसारख्या समस्या देखील सुरू होऊ शकतात. जर तुम्हाला कॉफी पिण्याची गरज वाटत असेल तर त्यासोबत हलके काहीतरी खाणे चांगले.

4 गोड किंवा साखरयुक्त पदार्थ

सकाळी रिकाम्या पोटी केक, पेस्ट्री, मिठाई किंवा साखरयुक्त दही यांसारखे गोड पदार्थ खाल्ल्याने तुमच्या रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने वाढू शकते. यामुळे तुम्हाला दिवसभर थकवा आणि कमी ऊर्जा जाणवतेच, शिवाय साखर खराब झाल्यावर चिडचिड आणि डोकेदुखी देखील होऊ शकते. साखर पचनसंस्थेत किण्वन सुरू करू शकते, ज्यामुळे गॅस आणि अस्वस्थता येते.

5 टोमॅटो (कच्चे) : टोमॅटोमध्ये टॅनिक ॲसिड असते जे पोटाच्या आतील आवरणाला नुकसान पोहोचवू शकते आणि रिकाम्या पोटी आम्लता वाढवू शकते. टोमॅटो आरोग्यासाठी फायदेशीर असले तरी, सकाळी रिकाम्या पोटी ते खाणे योग्य नाही. तुम्ही ते शिजवलेल्या स्वरूपात, जसे की सूप किंवा भाजीपाला, समाविष्ट करू शकता.

# चाणक्य असणारा महाराष्ट्राचा मास लीडर : देवेंद्रजी फडणवीस

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र_फडणवीस यांचा वाढदिवस.. गेले दशकभर "देवेंद्र फडणवीस" हे नाव राज्याच्या सत्तापटलावर या ना त्या कारणांमुळे गाजत आहे.

निष्कलंक, चारित्र्यसंपन्न आणि आपल्या कामाप्रति प्रामाणिक असणारा हा लोकनेता गेली दशक पूर्णपणे महाराष्ट्राच्या राजकारणाचा आणि सत्ताकारणाचा एकमेव केंद्रबिंदू ठरत आहे..

नागपूर शहरात भाजपला सत्तेवर आणण्यासाठी आपले शीर्षस्थ नेते नितीनजी गडकरी यांच्या खांद्याला खांदा लावून घेतलेले परिश्रम देवेंद्रजी फडणवीस यांना महापौर पदाच्या रुपात फळाला आले. वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी ते राज्यात सर्वात तरुण महापौर म्हणून पुढे नावारुपाला आले.

देवेंद्रजी फडणवीस हे एक लोकप्रिय नेते आहेत. नगरसेवक, महापौर, आमदार ते मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते हा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी असा राहिलेला आहे.

एक धुरंदर नेता म्हणून त्यांचे मला सर्वात जास्त आवडणारे गुण म्हणजे हजरजबाबीपणा, जबरदस्त वक्तृत्व, एखादा विषय मांडण्याची हातोटी, राज्यभर अफाट दौरे, प्रचंड जनसंपर्क आणि अतिशय महत्त्वाचे म्हणजे स्व पक्षात असो किंवा विरोधकांच्या गोटात, पुढच्या क्षणाला काय होणार आहे ह्याचा त्यांना बहुतांश वेळा येणारा अचूक असा अंदाज.... प्रत्येक क्षणी विरोधकांच्या डावाला प्रतिडाव टाकण्याची असणारी त्यांची चाणाक्ष बुद्धी..

देवेंद्रजी फडणवीस यांची अफाट आणि अचाट कार्यक्षमता भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाच्याही नजरेत भरली आणि पुढे ते महाराष्ट्र राज्य भाजपा प्रदेशाध्यक्ष झाले. अर्थात त्यावेळी येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षबांधणी आणि विरोधकांना एक सक्षम पर्याय म्हणून एक अभ्यासू, आक्रमक वक्तृत्व असलेले शालीन नेतृत्व याद्दष्टीने भाजप पक्षश्रेष्ठींनी हा निर्णय घेतलेला होता. पक्षश्रेष्ठींचा निर्णय सार्थ ठरवत देवेंद्रजींनी २०१४ च्या विधानसभा निवडणूक प्रचारात पक्ष प्रतिमेला साजेसा पण अतिशय आक्रमक पवित्रा घेतला होता. एकीकडे २५ वर्षे जुनी युती तोडून शिवसेना विरोधी पक्ष म्हणून समोर उभी ठाकली असताना दुसरीकडे काँग्रेस, राष्ट्रवादीला भुईसपाट करत सेनेला त्यांनी केलेली चूक दाखवत महाराष्ट्रात पक्षाला 'न भूतो न भविष्यति' असे यश मिळवून दिले.



राजकीय विश्लेषक भलेही त्यावेळच्या 'मोदी लाटे'चा उल्लेख करतील पण 'देशात नरेंद्र, राज्यात देवेंद्र' हे समीकरण जनतेला त्यावेळी मनस्वी पटलेले होते. त्यामुळेच महाराष्ट्र राज्यात पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाचे १०० च्या वर आमदार निवडून आले. तोच पराक्रम त्यांनी २०१९ विधानसभेला दाखवून पुन्हा एकदा राज्यात भाजपाची शंभरी पार केली. २०२४ ला पण ....

५ वर्षे मुख्यमंत्री म्हणून राज्यशकट हाकताना देवेंद्रजी फडणवीस यांनी स्वतः सम्राटाच्या भूमिकेत न राहाता 'चाणक्या'च्या बुद्धी चातुर्याने कारभार केला. विरोधी पक्षांनी सातत्याने मार्गात उभे केलेले अडथळे, पक्षांतर्गत छुपे विरोध, मित्र पक्षाने चालवलेली अडवणूक, समोर शरद पवार यांच्यासारखा बलाढ्य विरोधक या साऱ्या प्रतिकूलतेवर मात करत देवेंद्रजी फडणवीस यांनी अत्यंत मुत्सद्दी आणि धोरणीपणे राज्य प्रगतीपथावर नेहण्यासाठी कोणत्याही प्रश्नावर तात्पुरती मलमपट्टी न करता दीर्घकालिन उत्तर शोधण्यावर परिश्रम घेतले.

आज राज्यात विविध पक्षांमध्ये अनेक महारथी, धुरंधर नेते सक्रिय आहेत आणि त्या सगळ्यांना आपले मुख्य विरोधक हे फक्त देवेंद्र फडणवीस हेच वाटतात हे एक प्रकारे त्यांचे यशच आहे .

२०१९ ला बहुमताचे जवळ असताना शिवसेनेच्या सत्ता लालशी भूमिकेने सत्ता मिळाली नाही. मात्र अडीच वर्षात ठाकरेंना धोबीपच्छाड देते एकनाथ शिंदे ना मुख्यमंत्री केले. तेच नाही तर शरद पवार यांच्यावर मात करत राष्ट्रवादीत उभी फुट पाडली. अजित पवार यांना सोबत घेऊन राज्याच्या राजकारणात किंगमेकर झाले. २०२४ ला दोन तृतीयांश बहुमताचे सरकार आणून मुख्यमंत्री झाले.

साथ पक्षाची आहे पण कष्ट हे देवेंद्रजी फडणवीस यांचे स्वतःचे आहेत.. त्यातही त्यांना घराघरात पोहोचवायच्या कामात मात्र विरोधकांच्या विविध सोशल मीडिया टिमनी राबून अधिकचा हातभार लावलेला आहे.. त्यासाठी त्या सर्व विरोधी पक्षांचे आभार..!!

विरोधक काय करतील..??

देवेंद्र फडणवीस यांना ते ब्राम्हण आहेत म्हणून हिनवतील, ते एका रुपयांचा भ्रष्टाचार करू शकले नाहीत, त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे कधीही कुठेही सापडत नाहीत म्हणून चिडतील, त्यांनी आपल्या सुविद्य पत्नीला बळजबरीने घरी बसवून ठेवले नाही म्हणून त्यांना नावे ठेवतील..

काय, करतील काय विरोधक मित्र..?? देवेंद्र फडणवीस यांच्या शरीर यष्टीवर बोलतील? विविध नावांनी त्यांची हेटाळणी करतील? स्वतःला प्रसिद्धी मिळावी म्हणून कारण नसताना त्यांच्या पत्नीला टीकेचे लक्ष्य करतील ??

पण एक मुरलेला राजकीय नेता कधीही अशा प्रकारच्या टिकेला कुठलीही भीक न घालता असल्या तमाशाकडे ढुंकून ही बघत नाही. मग ते नरेंद्रजी मोदी असोत की देवेंद्रजी फडणवीस असोत..

पण विरोधकांच्या अशा कपटी, द्वेषी आणि विकृत टीकांना मात्र देवेंद्रजी फडणवीस हे अजिबात विचलित न होता, सर्वसामान्य जनतेत नेहमीप्रमाणे जाऊन केल्या गेलेल्या सर्व टिका टिपन्नी सकारात्मकतेमध्ये बदलवुन उत्तर देतात.

महाराष्ट्रासारख्या थोर परंपरा आणि भौगोलिक विविधता असलेल्या, प्रशासकीय दृष्ट्या कारभार करण्याबाबत अवघड अशा राज्याचे नेतृत्व करणे हे येरा गबाळ्याचे काम नव्हे.. आणि म्हणूनच वयाच्या अवघ्या ४४ व्या वर्षी ही अवघड जबाबदारी अगदी लीलया पेलत महाराष्ट्र राज्याच्या आजवरच्या महनीय मुख्यमंत्र्यांच्या मांदियाळीत आपले अनोखे वेगळेपण अधोरेखित करायला लावणारे देवेंद्रजी हे '#एकमेवाद्वितीय'च ठरतात.

ज्या प्रमाणे कोंबडे झाकल्याने सूर्य उगवायचा राहत नाही त्याच प्रमाणे सर्व विरोधकांच्या छाताडावर पाय देऊन देवेंद्रजी फडणवीस संपूर्ण बहुमताने मुख्यमंत्री झाले...

शेवटी एवढेच सांगेन की, राजकारण म्हणजे करिअर समजून काम करणाऱ्यांसाठी देवेंद्रजी फडणवीस यांचे नेतृत्वगुण हे '#दीपस्तंभ' आहेत.

महाराष्ट्राच्या अशा या लाडक्या लोकनेत्याला माझ्याकडून वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.. !

उदंड निरोगी आयुष्य देवो आणि येणाऱ्या प्रत्येक दिवशी यशाची नवनवी शिखर गाठण्यासाठी बळ देवो हीच प्रार्थना..!!

**भूषवलेले पदे**

**१९८९ भारतीय जनता युवा मोर्चाचे नागपूरमधील वॉर्ड अध्यक्ष**
**१९९९ ते आजतागायत - विधानसभा सदस्य**
**१९९२ ते २००१ सलग दोन वेळा नागपूर महापालिकेचे सदस्य, दोन वेळा नागपूरचे महापौर**
**१९९४ भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष**
**२००१ भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष**
**२०१० भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाचे सरचिटणीस**
**२०१३ भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष**
**२०१४ ते २०१९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री**
**२०१९ ला दुसऱ्यांदा मुख्यमंत्री**
**२०१९ ते जून २०२२ महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते**
**जून २०२२ पासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री**
**५ डिसेंबर २०२४ पासुन तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री**

**माझ्या बाबांना इंदिरा गांधींनी अटक केली त्यामुळे मी इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये शिकणार नाही, असे आणीबाणीच्या काळात वयाच्या सहाव्या वर्षी देवेंद्रने आईला बजावून सांगितले. शेवटी त्या कॉन्व्हेंटमधून त्याला सरस्वती शाळेत टाकावे लागले. संघ, जनसंघाच्या संस्कारांचे बाळकडू मिळालेला तोच मुलगा पुढे भाजपाचा प्रदेशाध्यक्ष झाला आणि नंतर महाराष्ट्राचा तीन वेळा मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता उपमुख्यमंत्री असे पद भूषवणारा देवेंद्र फडणवीस अर्थात देवाभाऊ होय.**

## वाड्यात जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : वाड्यातील नामांकित संगणक प्रशिक्षण संस्था आय. टी. जिनियस कॉम्प्युटर एज्युकेशन व क्रांतिज्योत बहुउद्देशीय सामाजिक संघटना ह्यांच्या माध्यमातून सलग तीन वर्ष जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात येत असून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संदर्भात केवळ मार्गदर्शनच नाही, तर थेट परीक्षेची संधी, व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा काय असते, त्यासाठी कशा पद्धतीने अभ्यास करावा, भविष्यात द्यावयाच्या असलेल्या स्पर्धा परीक्षा, नोकर भरती ह्याच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो.

सन 2025/26 मध्ये ही परीक्षा 3 गटात होणार असून विजेत्यांना रोख रक्कम सह सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देण्यात येतात.

25/26 मधील परीक्षा 30 नोव्हेंबर 2025 रोजी होणार असून नावनोंदणी सुरु झाली आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊन भविष्याच्या तयारीला सुरुवात करावी असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## निर्लेखित साहित्याच्या विक्री करिता जी.एस.टी.नोंदणीधारक खरेदीदारांनी सिलबंद निविदा सादर कराव्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड या संस्थेतील वापरुन निर्लेखित झालेल्या साहित्याची विक्री जसे आहे त्या स्थितीत निविदा पध्दतीने करणे प्रस्तावित्त आहे. यामध्ये निर्लेखित झालेले यंत्रसामुग्री व उपकरणे इत्यादी साहित्याचा समावेश असून या निविदा प्रक्रियेकरीता लिफाफा पध्दतीने निविदा सादर करावयाची आहे. त्यासाठी फक्त जी.एस. टी.नोंदणीधारक खरेदीदारांनी सिलबंद निविदा सादर कराव्यात, असे आवाहन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एन.एस.पुरकर यांनी केले आहे. विक्री करावयाच्या वस्तू संस्थेतील संबंधीत विभागामध्ये दि. 25 जुलै ते दि.2 ऑगस्ट 2025 या कालावधीत सुटीचे दिवस वगळून सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यन्त पहावयास मिळतील. याच कालावधी दरम्यान सादर करावयाच्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज रु.300/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र ) ना परतावा किंमतीत संस्थेच्या कार्यालयामधून विकत घेता येईल.सदर नमुन्यातील पूर्ण माहीती अचुक पणे भरलेली निविदा अर्जासोबत रु. 5,000/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) अनामत रक्कम जमा करणे गरजेचे असेल सदर रक्कमेचा भरणा प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि. रायगड या नावाने डी.डी. च्या स्वरुपात करावा. इच्छुक जी.एस.टी. नोंदणी धारक खरेदी दारांनी वर उल्लेख केलेल्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज डी.डी. सह (प्रपत्र अ व प्रपत्र ब करीता वेग्ळे स्वतंत्र लिफाफा द्यावा) दि.2 ऑगस्ट 2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यन्त सुटीचे दिवस वगळून सिलबंद लिफाप्यात कार्यालयात जमा करावा.संपूर्ण निविदा प्रक्रीया रदद करण्याची किंवा त्यामध्ये फेरबदल करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. सदर सिलबंद निविदा दिनांक04 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 2.30 वा. संस्थेच्या प्राचार्याच्या कक्षात उघडण्यांत येतील.




**मेष**

व्यावसायिकांसाठी चांगली बातमी असून मोठी डिल होण्याची शक्यता आहे. तुमची काही कामे थांबलेली होती ती पूर्ण होतील.

**वृषभ**

करिअर तसेच व्यवसायात चांगल्या संधी तुमच्या आसपास आहेत त्याचा लाभ घ्या.वादविवादाची परिस्थिती ऑफिसमध्ये निर्माण होईल.

**मिथुन**

तुम्ही स्वतः कामात फोकस ठेवा यामुळे कामे वेळेत मार्गी लागतील. अनेक दिवसांपासून सुरू असलेला ताण आज काहीसा कमी होईल.

**कर्क**

स्पष्ट बोला, त्यामुळे समस्या कमी होतील. ताणतणाव कमी होईल.अपेक्षित धनलाभ झाल्याने मनोबल वाढेल. तुम्ही करिअरसाठी उपयोगी पडेल असे शिक्षण घेण्याचा

**सिंह**

तिर्थयात्रा करण्याची योजना आखणार आहात पण काही कारणामुळे ही यात्रा पुढे ढकलावी लागेल. मंगलकार्यासाठी खर्च करणार आहात.

**कन्या**

तुम्ही शांत राहा आणि संयमाने काम करा. व्यवसायात कोणताही निर्णय घेताना सतर्क राहा. आज जोखीम असणारे काम घेवू नका.

**तूळ**

घरासंदर्भातील मालमत्तेचा काही वाद कोर्ट-कचेरीमध्ये सुरु असेल तर त्यामध्ये निकाल तुमच्या बाजूने असेल. घरात कोणी आजारी असेल तर त्याच्या तब्येतीत

**वृश्चिक**

विचार करत असाल तर त्वरित सुरुवात करा.घरी वातावरण समाधानी असून सगळेजण तुम्हाला कामात मदत करण्यासाठी तयार राहतील.

**धनु**

तुम्हाला उत्तम यश मिळेल. जे जातक फ्रिलान्स काम करतात त्यांना मोठे प्रोजेक्ट मिळण्याची शक्यता आहे. रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत.

**मकर**

कोणी तुमच्याकडे उधारी मागेल तर देवू नका. आर्थिक स्थिती ठिक असली तरी पैसे जपून वापरा आणि बचत करण्याचा प्रयत्न करा.

**कुंभ**

सुधारणा होणार आहे.तुम्ही परदेशात देखील व्यवसायाचा विस्तार करु शकता.करिअरमध्ये प्रगती आहे. ऑफिसमध्ये तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते

**मीन**

तुम्ही स्वतःसाठी वेळ काढणार असून खरेदी देखील कराल. तुम्हाला काही नवीन माहिती मिळेल, ही माहिती भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.







# ठाणे महापालिका क्षेत्रातील १५१ अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**११७ बांधकामे पूर्णपणे निष्कासित, ३४ बांधकामांतील वाढीव बांधकाम हटवले ■ १९ जूनपासून नियमितपणे ही कारवाई सुरु**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आणि प्रभाग समितीच्या बीट निरिक्षकांनी केलेल्या पाहणीत आढळलेल्या १५१ अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने आतापर्यंत कारवाई केली आहे. १९ जूनपासून नियमितपणे ही कारवाई सुरू असून त्यात शीळ येथील एम के कम्पाऊंडमधील २१ इमारतींच्या पाडकमांचाही समावेश आहे. या १५१ अनधिकृत बांधकामांपैकी ११७ बांधकामे पूर्णपणे निष्कासित करण्यात आली आहेत. तर, ३४ बांधकामांमधील अनधिकृत वाढीव बांधकाम हटवण्यात आले आहे.



ठाणे महापालिका क्षेत्रात, १९ जूनपासून नियमितपणे अतिक्रमण विरोधी पथकाची कारवाई सुरू आहे. त्यासाठी नऊ प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात विशेष पथकांची महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नियुक्ती केली आहे.

प्रभाग समिती क्षेत्रात बीट निरीक्षकांनी नोंदलेली आणि सध्या सुरू असलेली अनधिकृत बांधकामे पाडण्यास या मोहिमेत प्राधान्य आहे. आतापर्यंत तोडण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांमध्ये ११७ बांधकामे पूर्णपणे पाडली आहेत. तर, ३४ या बांधकामांमधील अनधिकृत वाढीव बांधकामे हटवण्यात आल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे यांनी दिली.

### कारवाईच्या आकडेवारीचा तक्ता

(१९ जून ते २४ जुलैपर्यंतची आकडेवारी)

- नौपाडा-कोपरी – १०
- दिवा – ४०
- मुंब्रा – २०
- कळवा – १७
- उथळसर – १०
- माजिवडा-मानपाडा – २६
- वर्तक नगर – ११
- लोकमान्य नगर – १३
- वागळे इस्टेट – ०४

**एकूण – १५१**

महापालिका क्षेत्रात अनधिकृत चाळी, अनधिकृत बैठी बांधकामे, वाढीव शेड, वाढीव बांधकाम, प्लिंथचे बांधकाम, अनधिकृत टर्फ या प्रकारच्या बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याची माहितीही उपायुक्त पाटोळे यांनी दिली.

या मोहिमेची अमलबजावणी आणि प्रत्यक्ष कारवाई यांचा दैनंदिन स्वरुपातील आढावा अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे घेत आहेत. अतिक्रमण विरोधी कारवाईमध्ये उपायुक्त (परिमंडळ), सर्व सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, अतिक्रमण आणि बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. या कारवाईसाठी पोकलेन, जेसीबी, गॅस कटर, ट्रॅक्टर ब्रेकर, मनुष्यबळ यांचा वापर करण्यात येत आहे. पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात येत आहे.

# कोल्हापूरच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबद्ध

## – शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची ग्वाही

**कोल्हापुरात शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे खा डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाकडे शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बारीक लक्ष आहे. शिंदे साहेबांच्या नेतृत्वात महायुती सरकारने कोल्हापूरच्या विकासासाठी हजारो कोटींचा निधी दिला. यापुढेही कोल्हापूरला ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याची पूर्तता करु, अशी ग्वाही शिवसेनेच्या संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली. शिवसेना पक्षाच्या कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते शनिवारी झाले. यावेळी ते बोलत होते. या सोहळ्याला जिल्ह्याचे पालकमंत्री व सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धैर्यशील माने, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार चंद्रदीप नरके, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, आमदार अशोक माने, माजी खासदार संजय मंडलिक, माजी आमदार सुजित मिणचेकर, माजी आमदार जयश्री जाधव आणि जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले की, कोल्हापूरकरांनी शिवसेनेला भरभरुन प्रेम केले. इथल्या मतदारांनी महायुतीच्या १० पैकी १० जागा निवडून दिल्या. यात शिवसेनेचे पाच आमदार निवडून आले. या मध्यवर्ती कार्यालयाच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या सोडवता येतील. जिल्ह्यात मध्यवर्ती कार्यालय असावे अशी बऱ्याच वर्षांपासून कार्यकर्त्यांची मागणी होती. आज मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या माध्यमातून ती पूर्ण झाली, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

एकनाथ शिंदे साहेबांनी अडीच वर्ष राज्याचे नेतृत्व करताना महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी यांच्यासाठी अनेक निर्णय घेतले. लाडकी बहिण योजना आणली. कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मोठे निर्णय घेतले. अडीच वर्ष पायाला भिंगरी लावून फिरणारा मुख्यमंत्री पहिल्यांदा या महाराष्ट्राने पाहिला. या कामामुळेच सर्वसामान्यांचा विश्वास शिंदे साहेबांवर आणि शिवसेनेवर बसला, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. जेष्ठ नागरिकांना एसटीमध्ये मोफत प्रवासाची सवलत योजना लागू केली. सुरुवातीला या योजनेची खिल्ली उडवली गेली, मात्र या योजनेचा लाखो ज्येष्ठांनी लाभ घेतला. याबाबत पन्हाळा ते पावनखिंड या मोहीमे दरम्यान आपल्याला अनुभव आल्याचे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. या मोहीमेच्या वाटेवर एक ज्येष्ठ नागरिक वाट पाहत होते. ते मला भेटले आणि त्यांनी एकनाथ शिंदे यांना धन्यवाद देण्याची भावना व्यक्त केली. तळागाळातील लोकांसाठी शिंदे साहेबांनी केलेल्या कामाचा आपल्याला अनुभव येतो, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. काहीजण सकाळ संध्याकाळ टोमणे मारण्याचे, शिव्या देण्याचे काम करतात, पण त्यांना मतदारांनी घरी बसवले असा टोला खासदार डॉ. शिंदे यांनी उबाठाला लगावला.

जिल्ह्यात पाऊस असून देखील मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित आहेत. शिवसेना हा विचार आहे. तो पुढे घेऊन जात असताना तो ऊन वारा पाऊस कशाचीही तमा बाळगत नाही हे आज पुन्हा एकदा दिसून आले, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. गाव तिथं शाखा घर तिथं शिवसैनिक ही मोहीम सुरु आहे. त्यासाठी सदस्य नोंदणी सुरु करा. लोकसभा आणि विधानसभेप्रमाणे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्वांनी एकजुटीने काम करायचे आहे. ही निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. त्यामुळे नेत्यांनी कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभ राहायचं आहे. जिल्ह्यात महायुतीचा भगवा नक्कीच फडकेल, असा विश्वास खासदार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला.



# कष्टि गावात NSS आणि गोदरेज कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने फळझाड लागवड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या व गोदरेज कंपनीच्या संयुक्त पुढाकाराने दिनांक २५ जुलै २०२५ रोजी कष्टि गावात ५० फळझाडांची यशस्वी लागवड करण्यात आली.

या उपक्रमाचा उद्देश पर्यावरण रक्षणासोबतच ग्रामीण भागातील हरित क्षेत्र वाढवणे व भावी पिढीला स्वच्छ, समृद्ध वातावरण उपलब्ध करून देणे हा होता. आंबा, पेरू, सीताफळ, चिकू आणि जांभूळ अशा स्थानिक हवामानास अनुरूप फळझाडांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य मा.श्री. के.आर. कळकटे, NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. रसिका सकपाळ, गोदरेज कंपनीचे CSR प्रमुख श्री.निकेश मढवी, ओम परटोले, कष्टि ग्रामपंचायतीचे सरपंच भगवान मोकाशी, शाळेचे शिक्षक आणि NSS चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

NSS स्वयंसेवकाने झाडांची लागवड, पाणी देणे आणि कुंपण घालणे अशी सर्व कामे पार पाडली.

या उपक्रमामुळे गावात पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक संदेश गेला असून भविष्यात ही फळझाडे स्थानिकांसाठी उत्पन्नाचे साधन ठरणार आहेत. “झाडे लावा, झाडे जगवा” या संकल्पनेला कृतीत उतरवत NSS व गोदरेज कंपनी यांनी एक प्रेरणादायी सामाजिक भान दाखवले आहे.

# खंडित होणारा विद्युत पुरवठा सुरळीत करुन उपाययोजना करण्याची वासिंद पोलिस ठाण्याची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : शहरात व परिसरातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करुन इतर वीज समस्या बाबत योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी वासिंद पोलिस ठाण्याच्या वतीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण, कार्यालयाकडे निवेदन देऊन करण्यात आली आहे.

येथील वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरीक, व्यापारी व शेतकरी वर्ग यांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच विद्युत तारा लोंबकळत असल्याने यामुळे जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नागरिक व्यक्त करीत आहेत असून या संदर्भात पत्रव्यवहार होऊनही दखल घेतली जात नाही असे निवेदनात म्हटले आहे.

तसेच विद्युत तारा, पोल, डिपी (ट्रान्सफॉर्मर) यांची वेळेत दुरुस्ती करून नागरिकांचे जीवन व मालमत्तेची हानी होणार नाही व वारंवार विजपुरवठा खंडित होणार नाही याची काळजी व दक्षता घेऊन कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी सहायक पोलिस निरीक्षक पी.वाय. कादरी यांनी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# लग्नाळू तरुण – तरुणींसाठी शंभर लग्नगाठी बांधणारे सेवाव्रती हभप विठ्ठल पाटील महाराज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : आजच्या काळात विवाह इच्छुक तरूण - तरुणींसाठी लग्न जुळवणे म्हणजे मोठी अवघड जबाबदारी बनली आहे. योग्य जीवन साथी निवडताना त्याविषयी खात्रीशीर माहिती करून घेणे आवश्यक असते. आई वडील व सर्व नातेवाईकांना यावेळी फार कष्ट होतात.



आज धावपळीच्या जीवनात या सर्व बाबींसाठी आपला वेळ देणे सर्वच पालकांना शक्य होत नाही. अशा वेळी आपल्या विश्वासू हक्काच्या माणसाकडून जर स्थळ सुचवले तर त्याला वधू-वराच्या आप्तेष्टांकडून सर्वानुमते लवकर मंजूरी दिली जाते व लग्न सोहळा सहज पार पडतो.

वाडा तालुक्यातील ठुणावे गावचे ग्रामस्थ जेष्ठ समाजसेवक हभप विठ्ठल राघो पाटील मागील 30 वर्षांपासून वाडा तालुक्यातील मान्यवर व्यक्ती म्हणून कुणबी समाजातील अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्यक्रमासाठी उपस्थित असतात. लग्न सोहळ्यातील जुन्या चालीरीती मध्ये वेळेनुसार बदल आवश्यक आहे असा त्यांचा नेहमीच आग्रह राहतो. वारकरी संप्रदायाशी जोडलेले असल्याने अनेक गावांमध्ये त्यांचे सौहार्दपूर्ण सबंध आहेत. त्यामुळे लग्न इच्छुक तरूण तरूणींच्या पालकांची मुला मुलींबद्दलची माहिती, अपेक्षा त्यांना माहिती असतात.

आजपर्यंत शंभर पेक्षा जास्त लग्न त्यांच्या मध्यस्थीने, ओळखीने पार पडली आहेत व याच्या नोंदी त्यांनी टिपणवहीत नोंदवून ठेवल्या आहेत. अगदी विनामूल्य प्रबोधन, उद्बोधन, कमीतकमी खर्चात आटोपशीर व आदर्श विवाह सोहळा पार पाडण्यासाठी त्यांचे विचार आजच्या पिढीसाठी नमस्कार अतिशय महत्त्वाचे आहेत.

आज वयाच्या उत्तरार्धातही त्यांचे हे सामाजिक काम एका सेवाव्रती प्रमाणे अखंडपणे सुरू आहे.

## पेण पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे

# गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व केंद्रप्रमुख यांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे भव्य व प्रेरणादायी सत्कार सोहळ्याचे आयोजन पेण प्रायव्हेट हायस्कूल जुनियर कॉलेजच्या सभागृहांमध्ये करण्यात आले होते या कार्यक्रमात शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसह विविध शैक्षणिक स्पर्धांमध्ये सुयश मिळवलेले शिक्षक, माजी केंद्रप्रमुख , मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा एक व टप्पा दोन, नवभारत साक्षरता उपक्रमातील उत्कृष्ट साहित्य निर्मिती शाळा, उत्कृष्ट व्हिडिओ निर्मिती बक्षीस पात्र उपक्रमशील शिक्षक, तसेच निपुण भारत अभियान अंतर्गत निपुण शाळा यांचा सन्मान सोहळा गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे यांच्या नियोजनातून संपन्न झाला. या कार्यक्रमाला नगरपालिका प्रशासन अधिकारी श्रीमती संगीता माने, पेण प्रायव्हेट हायस्कूलचे प्राचार्य आर.एम.पाटील, नेने कन्या विद्यालयाच्या प्राचार्य अंजली जोशी, भाल विद्यालयाच्या प्राचार्य सावंत मॅडम, आशा किरण पानेडच्या मॅनेजमेंट डायरेक्टर रोज मेरी मॅडम, ट्री हाऊस प्राचार्य चव्हाण मॅडम तसेच सर्व आजी-माजी केंद्रप्रमुख, संघटनेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, व शिक्षक उपस्थित होते.

शालेय शिक्षणात उत्तम कामगिरी करणारा विद्यार्थी म्हणजे देशाच्या उज्वल भविष्यासाठीची बीजे आहेत असे मनोगत यावेळी प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या शर्यतीतच नव्हे तर संस्कार व मूल्यांमध्येही पुढे राहावे असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांकडून करण्यात आले. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मशाल आपल्या हातात ठेवून समर्पित भावनेने कार्य करत विविध शैक्षणिक स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या शिक्षकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. शैक्षणिक यशासाठी केलेल्या उत्तम योगदानाबद्दल माजी केंद्रप्रमुखांचा देखील यावेळी गौरव करण्यात आला तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा 14 शाळांचा सन्मान, नवभारत साक्षरता शैक्षणिक साहित्य निर्मिती व निपुण भारत अभियानांतर्गत यश प्राप्त केलेल्या शाळांचा देखील सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे यांनी केले तर सूत्रसंचालन संतोष सावंत यांनी केले.

**दुःखद निधन**

# कै. पांडुरंग शिवराम पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन

दैनिक जीवनदीप वाताचे शहापूर ग्रामीण प्रतिनिधी नरेंद्र पाटील यांचे सख्खे काका कै. पांडुरंग शिवराम पाटील यांचे वयाच्या 95 व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते शेतकरी कुटुंबातील असून शेतीमध्ये विविध प्रकारची पिके घेऊन त्यांनी आपलं



आयुष्य कष्ट करून घालवले व आपल्या कुटुंबाचा सांभाळ करून मुलांवर पुचण्यांवर योग्य ते संस्कार केले. त्यांच्या निधनामुळे पाटील( पानवे ) परिवारावर दुःखाचा डोंगर पसरलेला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित मुले, सुना नातवंडे विवाहित मुलगी, दोन विवाहित पुतणे सुना नातवंडे व एक पुतणी व जावई असा मोठा परिवार आहे.

# वंजारी समाजाचे राज्यस्तरीय अधिवेशन व विचार मंथन मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : संघटन काळाची गरज असून समाजाने एकत्र येऊन संवाद साधने, हितगुज करणे, समाजातील अडी-अडचणी, भविष्यातील समाजाची दिशा इत्यादी विषयावर या सखोल चर्चा व निर्णय घडवून आणण्यासाठी समस्त वंजारी समाज महाराष्ट्र राज्य यांचे वतीने वंजारी समाजाचे राज्यस्तरीय अधिवेशन व विचार मंथन मेळावा तसेच राज्यस्तरीय विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार सोहळा व समाज रत्न पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि.27 जुलै 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता टिप टॉप प्लाझा, ठाणे येथे आयोजित केला आहे.

या मेळाव्यामध्ये समाजातील साधुसंतांचा आशीर्वाद लागणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटण मा. मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांचे हस्ते होणार आहे. कार्यक्रामचे अध्यक्षस्थानी नेत्ररोगतज्ञ पद्मश्री तात्याराव लहाने तर स्वागत

**राज्यस्तरीय विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार व समाज रत्न पुरस्कार वितरण सोहळा**

अध्यक्ष डॉ. अमोल गीते असणार आहेत. कार्यक्रमांमध्ये सांप्रदायिक, प्रशासकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग, साहित्य, पत्रकारिता व वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. तसेच राज्यस्तरीय (एमपीएससी व यूपीएससी ) तसेच विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार केला जाणार आहे. राज्यातील समाज बांधवांनी या ऐतिहासिक सोहळ्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन वंजारी समाज मेळावा आयोजन समितीचे मार्गदर्शक धनराज गुट्टे यांनी केले आहे.




# कल्याणमध्ये ठेकेदार संघटनेच्या वतीने मयत हर्षल पाटील यांना श्रद्धांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका ठेकेदार संघटनेच्या वतीने मयत ठेकेदार हर्षल पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. जलजीवन मिशन योजनेचे काम करून ठेकेदार हर्षल पाटील यांना शासनाकडून कामाचे बिल मिळाले नाही अखेर त्यांनी आत्महत्या केली आहे. या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले आहेत. कल्याण डोंबिवली महानगरपालिका ठेकेदार संघटनेच्या वतीने महापालिकेच्या प्रवेशद्वारावर मयत हर्षल पाटील यांना ठेकेदार संघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी विजय भोसले, संजय देवरे, रामचंद्र औटी, कालिदास कदम, देविदास घरत, दर्शन देशमुख, अनंता पगार, तुषार जाधव, रवी गायकवाड, निलेश पाटील आदी ठेकेदार उपस्थित होते.

यावेळी ठेकेदार विजय भोसले यांनी सांगितले की, हर्षल पाटील या ठेकेदाराने काम पूर्ण करुनही शासनाकडून कामाचे बिल मिळाले नाही. अखेर त्यांनी आत्महत्या केली. शासनाने संपूर्ण बिलाचे पैसे व तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत केली पाहिजे. कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात जवळपास शंभरहून अधिक ठेकेदार आहेत. त्यातील अनेक ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची बिले बाकी आहेत. फक्त पाच ते दहा टक्के रक्कम दिली जाते. काम करुनही सहा सहा महिने बिले मिळत नाहीत. शेतकऱ्यांसारखी आमच्यावर आत्महत्याची वेळ येऊन देऊन नका ही महापालिका प्रशासनाला व शासनीला विनंती आहे असे सांगितले.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत

# अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिकाधारकांनी ई-केवायसी पूर्ण करावी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची (शिधापत्रिकाधारक) ई- केवायसी असणे शासनाने अनिवार्य केलेले आहे. लाभार्थ्यांचे शिधापत्रिकासोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांक बरोबर असल्याचे तसेच शिधापत्रिकेमध्ये नमूद असलेली व्यक्ती त्याच आहेत याची खात्री करण्यासाठी ई-केवायसी यंत्रणा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची ई-केवायसी तात्काळ पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड सर्जेराव सोनावणे यांनी केले आहे.

शिधापत्रिकांसोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांकाचे प्रमाणिकर पूर्ण करण्यासाठी व रास्तभाव दुकानस्तरावर ई-केवासयी मोहिम राबविण्यात येत आहे. शासनाचे निर्देशान्वये धान्याचा लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांची 100 टक्के ई-केवायसी करण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यामध्ये 75.72 टक्के लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण झालेली आहे. शासनाच्या पुरवठा विभागामार्फत शिधापत्रिकाधारक लाभार्थी यांची ई-केवायसी करण्यासाठी शासनाने दिलेली मुदतवाढ 30 जून रोजी संपली आहे. यापुढे ई-केवायसी करण्याकरिता शासनाकडून मुदतवाढ मिळणार नाही.

अद्यापही ज्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी केलेली नाही, अशा सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची ई-केवायसी पूर्ण करण्याकरिता आपण धान्य घेत असलेल्या नजिकच्या रास्तभाव धान्य दुकानामध्ये जावून ई-केवायसी पूर्ण करुन घ्यावी. तसेच अनेक शिधापत्रिकाधारकांचे अंगठे ई-पॉस मशीनवर स्कॅन होत नव्हते, यामुळे आता या शिधापत्रिकाधारकांचे ई-पॉस मशीनवर डोळे स्कॅन करुन (IRIS Scanner चा वापर करुन) ई-केवायसी प्रक्रीया पुर्ण करता येत आहे. तसेच ई-केवायसी करण्याकरिता Mera eKYC हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करुन त्याद्वारे देखील KYC करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. पुढील 1 महिन्यात ई-केवायसी न केल्यास आपल्या शिधापत्रिकेवरील धान्याचा लाभ बंद झाल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभार्थी यांची राहील.

ठाणे • रविवार •
२७ जुलै २०२५
पान ४
जीवनदीप वार्ता



# भिवंडीतील डोहळे ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शुद्धोधन जाधव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील डोहळे ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शुद्धोधन अशोक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.त्यामुळे मान्यवर ग्रामस्थ व सदस्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आहे. ग्रामपंचायत उपसरपंच दिनेश ठाकरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्या नंतर रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठी शुक्रवारी डोहळे ग्रामपंचायत येथे निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत शुद्धोधन जाधव यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने पिठासीन अधिकारी तथा डोहळे ग्रामपंचायतच्या सरपंच सुमन वाघे यांनी जाधव यांची उपसरपंच पदी नियुक्ती जाहीर केली. शुद्धोधन जाधव यांची उपसरपंच म्हणून नियुक्ती होताच कार्यकर्त्यांनी फटाके फोडत व ढोल ताशाच्या गजरात आनंद व्यक्त केला. याप्रसंगी भिवंडीचे आमदार महेश चौघुले, आरपीआयचे भिवंडी शहराध्यक्ष महेंद्र गायकवाड,माजी नगरसेवक विकास निकम व परिसरातील नागरिकांनी जाधव त्यांचे पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले. गावातील नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आपण निश्चितच पार पाडणार असून गावातील विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहणार आहोत अशी प्रतिक्रिया उपसरपंच शुद्धोधन जाधव यांनी व्यक्त केली आहे.

## औद्योगिक प्रशिक्षण या कौशल्य शिक्षण माहिती सत्राचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : इंडियन वूमन अँड चिल्ड्रेन फाउंडेशन, श्रीमती एस.एस.देशमुख विद्यालय पिवळी आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पिवळी येथे विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण या कौशल्य शिक्षण या माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय .) मध्ये उपलब्ध असलेले प्रशिक्षण व त्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, लागणारे कागदपत्र व प्रवेश प्रक्रिया संदर्भात माहितीचा अभाव असल्याने या आयटीआय शिक्षणाकडे जाण्याचा कल खूप कमी असतो. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच या शिक्षणाचे महत्त्व व भविष्यातील निर्माण होणाऱ्या संधी याबाबत सजगता निर्माण व्हावी यासाठी या माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रात उपस्थित फाऊंडेशन पदाधिकारी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिक्षक यांनी औद्योगिक प्रशिक्षण बाबत तसेच विविध विषयीपर माहिती देऊन मार्गदर्शन केले. यावेळी फाऊंडेशन अध्यक्ष प्रभाकर जाधव, श्रीमती एस.एस.देशमुख संस्था सचिव अनिल देशमुख, शाळेचे प्राचार्य विष्णू धानके, औद्योगिक प्रशिक्षण संस्था गटनिदेशक जीवन पाटील आदी पदाधिकारी, शिक्षक -शिक्षिकेतर व कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज दहावी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणन्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत




क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही (सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी

– श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी ( मेन बॅटल टँक ) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट ( एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.

डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथी निमित्ताने विनम्र अभिवादन!

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



जन्म होताना दुःख आहे, वृद्धावस्था दुःखमय आहे. स्त्री पुत्रादिक कुटुंबजन दुःखमय आहेत व अंत काळही सर्वात मोठा दुःखमय आहे. म्हणून जागा, जागा. अंतकाळाला रोज आठवा. नेहमी विचार करा की, आज मला यमदूत पकडण्यास आले तर मी कोठे जावे, नरकात, स्वर्गात की वैकुंठात? मृत्यू टाळणे तर शक्य नाही. मग पाप का करता? काही लोक तर समजणार असतात. दोन शेर भाजी आणायची असली तरी सारा बाजार धुंडतात. बुद्धी अशी शिजवतात ही कारले घेऊ की दोडके? ज्या गोष्टीचा विचार करायचा त्या गोष्टीचा विचार तर केला नाही आणि आता भाजीपाल्याचा विचार करीत असतात. मरणाची दररोज आठवण ठेवा. मृत्यूचे भय वाटेल तर हातून पाप घडणार नाही आणि ज्या दिवशी तुम्ही निष्पाप व्हाल त्या दिवशी तुम्ही संत व्हाल, झालात म्हणून समजा.

गुरुमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# 'यंदा बाप्पा शाडुचा' या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि जल प्रदुषणांस आळा घालण्यासाठी नागरिकांनी येत्या गणेशोत्सवासाठी शाडु मातीचीच मुर्ती तयार करावी, खरेदी करावी या करिता "यंदा बाप्पा शाडुचा" हा उपक्रम कल्याण डोंबिवली महापालिकेच्या पर्यावरण व प्रदुषण विभागामार्फत राबविला जात आहे. 'मुले म्हणजेच विदयार्थी हेच भविष्यातील देशाचे सुजाण नागरिक असल्याने या विदयार्थ्यांमार्फत शाडु मुर्तीची संकल्पना घरोघरी पोहचावी यासाठी काल महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात शालेय विदयार्थ्यांसाठी पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे व उप अभियंता मुराई यांच्यामार्फत शाडु मुर्तीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महापालिका परिक्षेत्रातील विदयार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहून उस्फुर्त प्रतिसाद दिला.

महापालिका परिसरातील संतोष जांभुळकर, गुणेश अडवाळ, शेखर ईश्वाद आणि सचिन गोडांबे या अनुभवी मुर्ती शिल्पकारांनी या कार्यशाळेत "आपणच आपला बाप्पा बनवा" या कार्यशाळेच्या ब्रीदवाक्यासोबत उपस्थित असलेल्या सुमारे 400 विदयार्थ्यांना श्री गणेश मुर्ती साकारण्याबाबत मार्गदर्शन केले. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी देखील "शाडु मातीचीच मुर्ती का बनवावी" याबाबत विदयार्थ्यांशी सुलभ संवाद साधत त्यांचे प्रबोधन केले.

या कार्यशाळेत उत्कृष्ट रित्या बाप्पाची मुर्ती साकारणा-या भाग्येश दहिवलकर (मोहिंदरसिंग काबूलसिंग शाळा), पुर्वा साबळे (गणेश बापुराव आघारकर शाळा), पुर्वेश काकडे, दिव्यराज कावरे (सुभेदार वाडा विदयालय) यांस अनुक्रमे प्रथम, व्दितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त अभिनव गोयल, मुख्य लेखा परिक्षक सुरेश बनसोडे, पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे तसेच महापालिकेचे इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

डोंबिवलीतही ह.भ.प.संत सावळाराम महाराज म्हात्रे क्रिडा संकुलातील कै.सुरेंद्र वाजपेयी सभागृह येथे पुढील आठवडयात अशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असून या कार्यशाळेत डोंबिवलीतील शाळांमधील विदयार्थ्यांनी उपस्थित राहून भरघोस प्रतिसाद दयावा असे आवाहन महापालिकेच्या पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## मुरबाड-कल्याण बस प्रवासाचे तीन तेरा !

### महत्वाच्या मार्गावर एस.टी. महामंडळाचे होतेय दुर्लक्ष!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील नागरिकांना, चाकरमान्यांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना मुंबई, ठाणे, कल्याण येथे जाण्यासाठी एकमेव प्रवासाची सोय आहे ति म्हणजे एस.टी. चि सेवा.परंतु सध्या हिच एस.टी. सेवा पुर्णपणे कोलमडून पडल असून त्याचा त्रास प्रवाशांना होत आहे. सध्या कल्याण-मुरबाड- माळशेज या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असून रस्ता खोदून ठेवला असल्यामुळे चिखल व खड्डयातून व जास्तीचा वेळ घालवून प्रवास तर करावा लागतोच परंतु या प्रवाशांना एस.टि.चि सेवा ही धड मिळत नसल्याने कल्याण- मुरबाड प्रवास म्हणजे मोठे जिकरीचे झाले आहे.

काल रात्री 8.वा कल्याणहून मुरबाडला प्रवाशी घेऊन निघालेलि बस अचानक कल्याण बसडेपो मध्येच ब्रेक डाऊन झाली. बस मधील प्रवाशांनी बसला धक्का मारून सुरू करण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. दुसरी बस देण्या संदर्भात प्रवाशांनी आगार प्रमुखांना विनंती केली परंतु कल्याण आगारातुन वेळेत कोणतेही सहकार्य मिळाले नाही. अखेर त्या प्रवाशांना मुरबाड येथे पोहचण्यास रात्रीचे बारा वाजले.यामध्ये चाकरमानी, शालेय विद्यार्थी, महिला,जेष्ठ नागरिक सुद्धा होते.

दरम्यान मुरबाडहुन सकाळी 7 ते 10 या वेळेत कल्याणकडे जाण्यासाठी दररोज मोठ्या प्रमाणात प्रवाशांची संख्या असते परंतु ऐन गर्दीच्या वेळेत मुरबाड बस आगारातुन बस उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांना तासनतास ताटकळत उभे राहण्याचे चित्र सध्या दिसत आहे. कल्याण मुरबाड बस फेर्या वाढविण्याची मागणी प्रवाशांकडून तसेच सामाजिक संघटना कडून गेले कित्येक दिवस होत आहे, प्रवाशांच्या या मागणीकडे एस.टी. महामंडळ दुर्लक्ष करत असून प्रवाशांना नाईलाजाने खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो.

दरम्यान या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी ठाणे वाहतूक नियंत्रक व मुरबाड आगार प्रमुखांशी संपर्क केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

## पेण येथील साई मंदिरातील समई व घंटा चोरीला

चोर अटकेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण शहरातील साई मंदिर, कासार तलाव, पेण येथे चोरीचा प्रकार घडला असून सदर गुन्ह्यामध्ये मंदिरातील 1 समई, 2 घंटा चोरीस गेल्या असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पेण उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली व पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या सूचनेनुसार गुन्हे प्रकटीकण शाखा, पेण यांनी तपास पथकाच्या दोन टीम तयार करून सुरू केला. पेण शहरातील सुमारे 15 ठिकाणचे cctv फुटेज तपासून अनोळखी आरोपीचे फुटेज प्राप्त केले. सदर आरोपी हा पेण एसटी बस स्टॅण्ड येथून बसून पनवेल बाजूकडे निघून तो रेल्वेने मुंबई येथे गेला असल्याचे समजले. टीमने रेकॉर्ड वरील आरोपी यांच्या पूर्व इतिहासाची पडताळणी केली असता त्यामध्ये महेश नंदकुमार चायनाखवा रा. थेरोंडा, आगळयाची वाडी, रेवदंडा, ता.अलिबाग हा २१ मे रोजी अलिबाग जेल मधून सुटला असल्याची माहिती मिळाली. सदर आरोपी चा फोटो प्राप्त करून पेण मधील सीसीटीव्ही मध्ये मिळालेल्या फोटो सोबत मॅच केला असता दोन्ही फोटो मध्ये साम्य दिसून आले. म्हणून तपास पथकाने सदर आरोपीकडे लक्ष केंद्रित केले. सदर आरोपी हा जेल मधून बाहेर आल्या पासून तो घरी राहत नसल्याचे समजले म्हणून तपास टीमने तांत्रिकदृष्ट्या अभ्यास करून 25 जुलै रोजी तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा मागोवा घेतला असता तो पनवेल येथून पेण बाजूकडे येत असल्याचे लक्षात आल्याने तपास टीमने खारपाडा चौकी येथे एसटी बसेस तपासले असता सदर आरोपी बसमधे मिळून आला आहे. त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने पेण पोलिस ठाण्यात दाखल गुन्हाची कबुली दिली आहे. तसेच, पेण शहर हद्दीतील आणखी वेगवेगळया मंदिरातून छोटी मोठी समई व घंटा किरकोळ स्वरूपाची चोरी केली आहे. तसेच वडखळ, दादर सागरी, रोहा व कोलाड पोलिस ठाणे हद्दितील मंदिरातिल समई व घंटा चोरी केल्या असल्याची कबुली दिली आहे सदर आरोपी यास अटक करून न्यायालयात हजर केले असता 29/07/25 पर्यंत पोलीस कोठंडी असून पुढील तपास करीत आहोत....

सदरची कामगिरी सपोनी निलेश राजपूत, राजेश पाटील, हेडकॉन्स्टेबल सुशांत भोईर, प्रकाश कोकरे, अजिंक्य म्हात्रे, सचिन वस्कोटी, अमोल म्हात्रे, गोविंद तलवारे संदीप शिंगाडे यांनी केली आहे.

### ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने

## अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचा सत्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे अन्न व नगरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचा शिक्षक संघाच्या वतीने नाशिक येथे सत्कार करण्यात आला.पुष्पहार शाल श्रीफळ व मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभ प्रसंगी राष्ट्रीय ओबीसी



बहुजन शिक्षक संघाचे अनिल नाचपल्ले सरचिटणीस संतोष भोजने राज्य कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण राज्य उपाध्यक्ष राजेंद्र खैरनार धनाजी घरत प्रदेश संघटक प्रशांत शेवाळे राज्य प्रसिद्धी प्रमुख प्रमोद आटोळे जितेंद्र मानकर..जिल्हा प्रमुख सुदाम धात्रक नाशिक विभाग प्रकल्प व्यवस्थापक सुवर्णा पगार बाळासाहेब सानप धनंजय सरक विनायक केंद्रे मोहनसिंग राठोड अशोक कोळे अनंत फुलसुंदर विठ्ठल म्हेत्रे आदिंसह रायगड पुणे लातूर धाराशिव, नाशिक जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिक्षक संघाच्या वतीने नामदार छगन भुजबळ यांना शिक्षक बांधवांचे प्रलंबित प्रश्न ओबीसी बांधवांना भेटसावणा-या विविध समस्या विषयी चर्चा करण्यात आली यावेळी सविस्तर बसून आपण योग्य तो निर्णय घेऊ असं सांगितले.

# मुसळधार पावसामुळे भिवंडी महामार्गावरील वाहतूक व्यवस्था कोलमडली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरात मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून मुंबई नाशिक भिवंडी बायपास महामार्ग व वाडा भिवंडी या महामार्गावरील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली आहे. खराब रस्त्यामुळे वाहन हळूहळू चालत असल्याने वाहतूक कोंडी झाली आहे.त्यामुळे या मार्गाने नियमित प्रवास करणाऱ्या नोकरदार वर्ग,शालेय विद्यार्थी व प्रवासी नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. भिवंडी शहर व ग्रामीण भागातील विविध ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिक त्रस्त



झाले होते.खंडित वीजपुरवठा मुळे यंत्रमाग कारखान्याचा खडखडाट थांबला होता, दुकानदार व इतर उद्योग व्यवसायावर सुध्दा त्याचा परिणाम झाला.शहरातील तीनबत्ती, निजामपूरा, शिवाजी नगर भाजीपाला मार्केट,दरगाह रोड, पद्मानगर,कामतघर, ताडाळी रोड अशा विविध ठिकाणी असलेल्या सखल भागात पावसाचे पाणी साचले होते.त्यामुळे पादचारी नागरिकांना विविध अडचणी चा सामना करावा लागला.

## कामवारी नदी दुथडी भरून वाहू लागली

भिवंडी शहर व ग्रामीण भागाच्या वेशीवरून वाहणारी कामवारी नदीला पूर परिस्थिती निर्माण झाल्याने ती दुथडी भरून वाहत होती त्यामुळे नदी किनारी राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याचे सूचना तहसीलदार कार्यालय व भिवंडी महापालिका प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

हवामान खात्याने मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आल्याने भिवंडी पालिका,पोलीस व शासकीय यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.पावसाचा जोर पाहता सुरक्षिततेच्या दृष्टीने नागरिकांनी घराबाहेर पडू नये असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.त्याचबरोबर तलाव व नदी किनारी राहणाऱ्या नागरिकांनी सावध राहावे असे आवाहन करण्यात आल्यामुळे पूरजन्य परिस्थितीपासून नुकसान होऊ नये यासाठी अनेकांनी आपापली घर बंद करून इतर ठिकाणी नातेवाईक वास्तव्य केल्याचे सांगितले. सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भिवंडी महापालिका प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून सुध्दा शहर व परिसरातील गटार व नाल्याची सफाई योग्य पध्दतीने न झाल्याने गटार व नाले तुडुंब भरून रस्त्यावर वाहू लागल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली होती.शहरातील विविध भागातील रस्ते खड्डे पडून मोठ्या प्रमाणात खराब झाले आहेत त्यामुळे वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला होता तर ग्रामीण भागात सुद्धा नदी नाले मुसळधार पावसामुळे ओसंडून वाहत होते,पावसामुळे बाजारपेठ परिसरात शुकशुकाट जाणवत होता. भिवंडी शहर व ग्रामीण भागातून वाहणाऱ्या कामवारी नदी दुथडी भरून वाहत असल्यामुळे नदी किनारी राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याचे सूचना देण्यात आल्यामुळे अनेक लोकांनी आपली घर बंद करून सरळ आपापल्या नातेवाईकांच्या घरी विश्रांतीसाठी गेले होते.महापालिकेचे आपत्कालीन विभाग कर्मचारी व पोलीस यंत्रणा रस्त्यावर गस्त घालून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.